June- 2017 E-ISSN: 2321-4953

International Research Fellow Association's

# IRFA's UNIRESEARCH

## Multidisciplinary International E-Research Journal

Vol.- VIII Issue- VI

*Indexed in DRJI & Indian Citation Index Journal*

*Double Blind Peer Reviewed*

*Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

You searched for **uniresearch** || Home ||

**Total Journals : 1**

Show 25 entries Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View | 1 | 63005 | Uniresearch- Multidisciplinary International E-Research Journal | International Research Fellows Association | 23214953 | |

Showing 1 to 1 of 1 entries Previous 1 Next

For Students For Faculty More

**Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Asst. Professor, Dept. of Marathi,
M.G.V.'s Arts & Commerce College, Yeola.
Nashik [M. S.] India.
dhanrajdhangar@gmail.com
Mobile No. 7775982534

UNIRESEARCH
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

*For Details, visit us on: www.uniresearch.net.in*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

# EDITORIAL BOARD

**Chief & Executive Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assistant Professor,
Dept. of Marathi,
M.G.V.'s Arts & Commerce College, Yeola,
Dist - Nashik [M.S.] India.

**Co Editors:**
**Mr.Tufail Ahmed Shaikh**, King Aziz City for Science & Technology, Riyadh Kingdom Saudi Arabia.
**Dr. B. M. Sonawane**, M.G.V.'s Arts College, Saundane, Dist - Nashik
**Dr. Anil Dongre**, Head, Dept. of Management, North Maharastra University, Jalgaon.
**Prof. D. M. Badure**, N. S. B. Arts, Commerce & Science College, Nanded.
**Dr. P. K. Shewale**, Vice Principal,MGV's Arts, Commerce & Science College, Harsul, Nashik.
**Prof. Sachin Patil**, D. D. S. P. College, Erandol.
**Prof. Atul Suryawanshi**, S.S.M.M. College, Pachora
**Dr. Rekha Gajare**, Bhusawal Arts, science & P.O. Nahata,Commerece College, Bhusawal.
**Dr. Gajanan Wankhede**, Asst. Prof. Dept. of Hindi.Baliram Patil College, Kinwat, Nanded
**Prof. Vijay Shirsath**, Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
**Prof. B. P. Shewale**, MGV's Arts, Commerce & Science College, Saundane, Nashik.
**Mr. Munaf Shaikh**, North Maharashtra University, Jalgaon
Mr. Vinod Bhalerao, J.N. V. Kangda Himachal Pradesh.

**AdvisoryBoard:**
**Dr. Marianna kosic**, Scientific-Cultural Institute, Mandala, Trieste, Italy.
**Dr. S. M. Tadkodkar**, Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University.Goa,India.
**Dr. Bajarang Korde**, Professor & Head, Dept. of English, Pune University. Pune, [M.S.] India
**Dr. M. S. Pagare**, Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon.[M.S.]
**Dr. R. P. Singh**, Dept. of English and Modern European Languages University of Lucknow [U.P.] India
**Dr. N. V. Jayaraman**, Director-Training and Placement, SNS Technical Institutions, Coimbatore

**Review Committee:**
**Dr. Shailendra Lende**, Dept. of Marathi, R.T.M. Nagpur University, Nagpur
**Dr. Sayyed Zakir Ali**, HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
**Dr. R. R. Kazi**, North Maharashtra University, Jalgaon.
**Dr. Vandana Chaudhari**, KCE's College of Education, Jalgaon.
**Dr. Vidya Vyavhare**, HOD, Marathi, KCE's M. J. College, Jalgaon.
**Dr. Sanjay Baviskar**, HOD, Marathi, D. N. Bhole College, Bhusawal.
**Dr. KalpanaPatil**, HOD, Hindi, D. N. College, Faizpur.
**Dr. K. R. Udmale**, Rtd. HOD, Cost and Works Accounting, M.S.G. College, Malegaon Camp, Nashik,

**Contact us on :** uniresearch99@gmail.com / researchjourney2014@gmail.com
Mobile No. : Prof. Dhanraj T. Dhangar - (President, IRFA) + 7775982534 / 9665398258

**Publishers :** International Research Fellows Association (IRFA) &
Mrs. Swati Sonawane, Director, Swatidhan Publication, Nashik (Mo. 9665398258)

*The respective authors are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Our review committee members have checked on their level best to stop furtive literature. Please send your valuable suggestions to us on uniresearch99@gmail.com*

- ***Executive Editor***

# INDEX


| No. | Name of the Article / Author’s Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Complexity of Region in ‘The Mayor of Casterbridge’ - **Dr. Leena Pandhare** | 03-07 |
| 2 | Suniti Namjoshi : A Glocal Face of Indian English Poetry **Dr. Jyoti Rane & Mukund S. Bhandari** | 08-11 |
| 3 | T. S. Eliot’s “Journey of the Magi” and the Five Codes of Roland Barthes **- Ashutosh R. Vardikar** | 12-15 |
| 4 | ‘A Spiritual Quest’ in Leo Tolstoy’s ‘The Three Questions’ - **Kamalakar B. Gaikwad** | 16-19 |
| 5 | Current Status of Wine Production and Consumption in Nashik District of Maharashtra - **Vikas Waghmare & Dr. Kunal Sinha** | 20-26 |
| 6 | Rural Housing under Bharat Nirman in India - **Usha H. Watane** | 27-29 |
| 7 | प्रवासी भारतीय कवि हरिशंकर आदेश की कविता ‘चाँद’ : ‘ध्वनि संरचना’ - **डॉ. गीता दोड़मणी** | 30-33 |
| 8 | भारतीय स्वतंत्रता संग्राम में हिंदी साहित्य की भूमिका **प्रा. कोमलकुमार परदेशी** | 34-38 |
| 9 | दुष्यंत कुमार की गजलो में अभिव्यक्त सामाजिक चेतना - **शिव कुमार जयस्वाल** | 39-41 |
| 10 | मराठी भाषेतील संगीत नाटके व नाट्य संगीत - **प्राचार्य डॉ. उज्ज्वला देवरे** | 42-45 |
| 11 | ‘आंबी’ कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा - **डॉ. भाऊसाहेब गमे** | 46-50 |
| 12 | प्रसार माध्यमे : काल-आज आणि सामाजिक मूल्यभान - **प्रा. अनिल भगत** | 51-58 |
| 13 | ताराबाई शिंदे यांच्या ‘स्त्री-पुरुष तुलना’ या निबंधातील स्त्रीविषयक विचार - **श्री.अनिल मुनगेलवार** | 59-60 |
| 14 | ‘अवकळा’ कृषि जीवनाच्या शोकात्म वास्तवाचा आलेख - **डॉ. भाऊसाहेब गमे** | 61-63 |
| 15 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेचा : एक विवेचक अभ्यास - **श्री.अनिल मुनगेलवार** | 64-65 |
| 16 | शालेय गृहपाठ : सर्वेक्षणात्मक अभ्यास - **डॉ. युवराज पाटील** | 66-71 |
| 17 | भारतातील ग्रामीण रस्त्यांसंदर्भात भारत निर्माण योजनेची भूमिका - **डॉ. विजय सुर्वे** | 72-75 |
| 18 | भारत व चीन संबंधाचे बदलते संदर्भ - **प्रा. संजय मराठे** | 76-79 |


*या विशेषांकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

**Contact us on :** uniresearch99@gmail.com / researchjourney2014@gmail.com
**Mobile No. :** Prof. DhanrajT. Dhangar - (President, IRFA)+91 7620576291 / 7709752380
**Publisher :** Mrs. Swati Dhanraj Sonawane - Director, Swatidhan Publiacation Yeola (Nashik) 423401
Mobile No. 9665398258

# मराठी भाषेतील संगीत नाटके व नाट्यसंगीत

**प्राचार्य डॉ. उज्ज्वला शिवाजी देवरे**
श्रीमती पुष्पाताई हिरे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय
मालेगाव कॅम्प, ता. मालेगाव, जि. नाशिक
सलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**प्रस्तावना :**

आजचे जग आधुनिक व प्रगतीचे जग म्हणून ओळखले जात आहे. मानवी जीवनात अन्न, वस्त्र, निवारा या जगण्याच्या प्राथमिक गरजा आहेत. परंतु मानवेतर प्राण्यांपेक्षा मानव भिन्न असण्याची ओळख म्हणजे त्याला साहित्याची जाण आहे. ज्ञान, कला, संगीत, नृत्य या गोष्टीत तो रमतो. परंतु दुर्दैवाने आज भौतिक सुविधांच्या मागे लागलेल्या मानवाला या गोष्टींचे महत्त्व समजत नाही. सर्वात पुढे जाण्याची शर्यत महत्त्वाची वाटते.

संगीत, कला व नृत्य यासारख्या मनोरंजनाच्या गोष्टी फक्त मानवी जीवनातच शक्य आहेत. मात्र आजचा युवावर्ग या गोष्टींना सन्मान व महत्त्व देतांना आढळत नाही. जीवनात केवळ पैसा व भौतिक सुविधा सुख देत नाहीत. तर संगीत नृत्य या अभिजात कलाही सुखी जीवन जगण्यास हातभार लावतात. संगीत व संगीत नाटके, नाट्यसंगीत यांचा अभ्यास या निबंधात करण्याचा हा माझा छोटासा प्रयत्न आहे.

**संगीत :**

संगीत ही प्राचीनतम कला आहे. आपल्या पूर्वजाला, आदिमानवाला जीवन जगताना अनेक अज्ञान गोष्टीचे भय वाटत असे. त्या अज्ञान शक्तींना प्रसन्न करून जीवनातील भीती घालविण्यासाठी आदिमानवाने ढोल व तत्सम चर्मवाद्ये बनवून त्यातून आवाज काढून, वाजवून या अज्ञात शक्तींना प्रसन्न करण्याचे प्रयत्न केले. त्यातूनच पुढे 'संगीत' जन्माला आले असावे असा मानववंश शास्त्रज्ञांचा कयास आहे.

संगीताची पाळेमुळे वेदांमध्ये रुजली आहेत. चार वेदांपैकी 'सामवेद' या वेदामध्ये 'संगीत' विषयी माहिती मिळते. कारण वेदांचा कर्ताकरविता मानव नसून ते अपौरुषेय मानले जातात. जगाचे नियंत्रण करणारी अज्ञान शक्ती हीच वेदांच्या निर्मितीचे कारण असल्याची भारतीयांची धारणा आहे.

भारतीय नानाविध जाती– जमाती भारतातील विविधता यामुळे भारतीय शास्त्रीय संगीताच्या व्यत्पत्तीबाबत निरनिराळे सिध्दांत प्रचलित आहेत. संगीताला वाहिलेल्या 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ भरतमुनींनी लिहिला आहे. त्यात संगीताबद्दल सर्वकष माहिती प्राप्त त्यामुळे त्याचा 'पाचवा' वेद म्हणून गौरव केला जातो.

नृत्य, गीत आणि वाद्य यांचे मिळून संगीत बनते. राग व ताल या भारतीय संगीतातील प्राथमिक संकल्पना आहेत. सा, रे, ग, म, प, ध, नी, सा या सप्तसुरांच्या आरोह– अवरोहातून 'राग' जन्माला येतात. तर 'ताल' हे लयीवर आधारित आहेत. ठरावीक अंतरावर, ठरावीक गतीने दिला जाणारा ठेका म्हणजे ताल.

भारतीय संगीताचे 'हिंदुस्थानी संगीत' व 'कर्नाटकी संगीत' हे दोन प्रकार असून उत्तर भारतीय संगीताला 'हिंदुस्थानी संगीत' तर दक्षिण भारतीय संगीताला 'कर्नाटकी संगीत' अशी बिरुदे आहेत. 'कर्नाटकी संगीत' हे भारतातील अतिप्राचीन संगीत मानले जाते.

**संगीत नाटक –**

संगीत नाटक हा मराठी रंगभूमीचा खास वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. संगीत हा कलाप्रकार व नाटक हा साहित्यप्रकार यांच्या संकटातून 'संगीत नाटका'चा जन्म झाला. संगीत नाटकाचा आकृतिबंध पुढीलप्रमाणे–

१) नांदी – संगीत नाटकाचा आरंभ 'नादी' या गीत प्रकाराने होतो. नांदीमध्ये ईशस्तवन म्हणजेच नटेश्वर, नाट्यदेवतेची स्तुती असते. उदा. संगीत शाकुंतल ह्या किर्लोस्कर लिखित नाटकाची सुरुवात पंचतुंड नररुंडमालधर' या नांदीने होते.

२) सूचकगीत– नांदीनंतर सूचकगीत प्रस्तुत केले जाते. त्यातून नाटकाची रुपरेषा सांगितली जाते.

३) कथानक – हा संगीत नाटकातील गद्यप्रकार आहे. तेथे पात्रांचे कथन, संभाषण, नाटकाचे कथानक पुढे सरकते.

४) पद– नाटकातील पद्य अगर काव्य प्रकार आणि संगीत नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण यातूनच मराठी नाट्यसंगीत या गानप्रकाराचा जन्म झाला. संगीत नाटक लिहिणारे नाटककार काव्य आणि नाट्यखेरीज संगीत कलेत देखील प्रवीण होते. शास्त्रीय संगीताची योग्य बैठक असल्याने कुठले पद कुठल्या छंदात आहे आणि ते कुठल्या रागात व तालात गायले जावे. या संबंधी सूचना पदाच्या आरंभी दिलेल्या आढळतात. उदा. संगीत सौभद्र (अण्णासाहेब किर्लोस्कर) मधील ''प्रिये पहा.... हे भूपाळी रागातले. पद, तर कृष्णाच्या तोंडी असलेली दिंडी 'गर्ग गुरुते घेतले' वश करोनी'

संगीत नाटकाचे आद्यकर्तृत्व त्रिलोकेकरांकडे जाते असे 'मराठी रंगभूमी' या ग्रंथाचे लेखक अप्पाजी विष्णु कुलकर्णी म्हणतात. मात्र संगीत नाटकाची चाल बळवंत पांडुरंग कुलकर्णी यांचेकडे आहे, असेही ते कबूल करतात. (संदर्भ– संगीत रंगभूमीचे सुवर्णयुग)

मराठी संगीत नाटकाचा 'संगीत शाकुंतल' चा पहिल्या चार अंकाचा पहिला प्रयोग पुण्यात 'आनंदोदभव' नाट्यगृहात ३१ ऑक्टोबर १८८० रोजी (अश्विन वद्य १३, रविवार शके धनत्रयोदशी) झाला ''मराठी रंगभूमीचा पाया किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' नाटकाचे घातला, हे म्हणणे बरोबर असेल, तरी अण्णांच्या या नाटकापूर्वी एकदोन वर्षे सोकर बापूजी त्रिलोकेकर यांनी १८७९ च्या जानेवारीत 'नलदमयंती' नामक गाद्यापद्यात्मक नाटक छापून प्रसिध्द केले' (संगीत मराठी रंगभूमी) त्यांच्या 'संगीत हरिश्चंद्र' या नाटकाची पहिली आवृत्ती १८८० मध्ये किर्लोस्करा शाकुंतलापूर्वीच प्रसिध्द झाली व या नाटकाचे प्रयोगही चांगले होत असत.

त्यानंतर सौभद्र, रामराज्यावियोग, द्रौपदी, विद्याहरण, शारदा, स्वयंवर, मानापमान, एकच प्याला.... अशा संगीत नाटकांची परंपरा सुरू झाली. १८८० ते १९३० हा संगीत नाटकांचा आणि पर्यायाने नाट्यसंगीताचा सर्व अर्थांनी सुवर्णकाळ होता.

अभ्यासकांनी व समीक्षकांनी संगीत नाटकांच्या या इतिहासाचे प्रमुख चार टप्पे केले.

१) किर्लोस्कर – देवल कालखंड – १८८०– १९१०

२) खाडिलकर – बालगंधर्व कालखंड – १९१० – १९३०

३) अत्रे – रांगणेकर कालखंड – १९३० – १९६०

४) गोखले – कानेटकर कालखंड १९६०– १९८०

**मराठी नाट्य संगीत :**

गायनाचार्य भास्करबुवा बखले, गोविंदराव टेंबे, पंडित राम मराठे, पंडित जितेंद्र अभिषेकी, छोटा गंधर्व, पंडित राम मराठे, पंडित जितेंद्र अभिषेकी, छोटा गंधर्व, केशवराव भोळे इ. दिग्गज संगीत रचनाकार (संगीतकार) लाभल्याने मराठी नाट्यसंगीत समृध्द झाले. वरील कालखंडातील संगीत नाटकांमध्ये विविध रागदारीतील पदे गायिली जात. या संगीतकारांतील प्रत्येक संगीत रचनाकार स्वत: उत्तम गायक होते. हिंदुस्थानभर भ्रमण करून संगीताचे ज्ञान आणि संस्कार त्यांनी आत्मसात केले होते. त्याचे प्रतिबिंब नाट्यसंगीतात पडणे, स्वाभाविक होते. जोगी, मुलतानी, सारंग, भैरवी, पूर्वी, खमाज, देस इ. विविध रागांमधील पदे एकट्या 'भिल्लीणी' नाटकात होती.

काही पदे लावणीच्या चालीवर तर काही गजलही होते. याचा अर्थ संगीत नाटक सुरू करण्याचा मान 'भिलीणी' नाटकाच्या कर्त्याला द्यायला हवा. पण तो दिला जात नाही, कारण या धाटणीचे सातत्य राहिले नाही व परंपराही राहिली नाही. प्रभावी परंपरा १०० वर्षे राहिली ती किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' ची म्हणून त्यांना संगीत रंगभूमीचे प्रवर्तक समजले जाते.

संगीत नाटकात संगीताचे नवनवे प्रयोग उत्तरोत्तर होत गेले. उदा. मानापमान नाटकातील अनेक चाली बनारस, लखनौ तसेच पंजाबातील उपशास्त्रीय गायन प्रकारांवर बेतलेल्या आहेत. तसेच 'स्वयंवर' मधील अनेक पदे मूळ बंदिशींवर आधारली आहेत.

दरम्यान अभिजात शास्त्रीय संगीत गाणारे मोठे कलाकारही मैफिलीत नाट्यसंगीताचा आविष्कार करू लागले. सवाई गंधर्व, हिराबाई बडोदेकर, ज्योत्स्ना भोळे पंडित भीमसेन जोशी इ. अनेक शास्त्रीय गायकांच्या मैफिलीतून नाट्यसंगीत लोकप्रिय होऊ लागले. तत्कालीन रसिकांच्या तोंडी ही नाट्यगीते येऊ लागली.

**संगीताचे नवे आकृतिबंध –**

मराठी संगीत नाटकांतून येणारी पदे निरनिराळ्या आकृतिबंधात गुफण्याची जणू स्पर्धा सुरू झली. भारतीय संगीत परंपरेतील विविध सांगीतिक आकृतिबंध नाट्यसंगीतातून व्यक्त होऊ लागले. ध्रुवपद– धमारापासून ते गजल– कव्वाली आणि भावगीतापर्यंत हे रचनेचे वैविध्य आढळते. ख्याल, तराणा, ठुमरी, कजरी, होरी, चैनी, गजल, कव्वाली, लावणी, आर्या, साक्री, दिंडी, अभंग, स्त्रीगीते असे अनेक प्रकार नाट्यसंगीतात दिसतात.

किर्लोस्करी नाटकांतील संगीतावर कर्नाटकातील यक्षगानाचा प्रभाव होता. महाराष्ट्रातील कीर्तन परंपरेचे व लोकसंगीताचे अंश (दिंडी, साकी, लावणी), जयदेवांच्या गीतगोविंदाचे प्रतिबिंब आणि शास्त्रीय गाण्याच्या मैफिलीत गायला जाणारा 'टप्पा' हा प्रकारही नाट्यगीतांत वापरलेला आहे.

नाट्यसंगीताच्या प्रसारामुळे 'रागां'चा ही चांगलाच प्रसार होऊन नाट्यसंगीत लोकप्रिय झाले. उदा. कठीण कठीण कठीण किती (बागेश्री) नाथ हा माझा (यमन) अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. अनेक संतांच्या रचनांना विविध रागात गाऊन या रचनाही रसिकांत लोकप्रिय ठरल्या. उदा. अवघाची संसार, सुखाचा, करीन (धानी), अमृताहूनि गोड नाम तुझे देवा (भीमपलास) देवा तुझा मी सोनार (जौनपुरी)

विविध कालखंडात नाट्यसंगीताचे अनेक प्रवाह निर्माण झाले. नाट्यसंगीतावर कीर्तन परंपरेचा प्रभाव वर सांगिलाच आहे. नाटकांचे विषयही पौराणिक असत उदा. सं. सौभद्र, सं. शाकुंतल स. द्रौपदी. मात्र कलाकारांच्या लहरीवर नव्हे तर आपले गीतकार म्हणून महत्त्वही अबाधित ठेवणारे देवलही त्यांच्या रचनाकार, गीतकार म्हणून असलेल्या उद्‌गारांवरून वेगळे उठून दिसतात. देवलांनी १९१६ मध्ये संशयकल्लोळ नाटक पदांसह लिहिले तेव्हा बालगंधर्व, भास्करबुवा गायकी चालींचा आग्रह धरून बसले. पण देवलांची ते मान्य केले नाही. ते म्हणाले ''पदांकडे लोक माझी पदे म्हणून पाहणार आहेत. पात्रांच्या लहरीप्रमाणे पदे करणारा कवी मी नाही. नाटक करा अगर करू नका. वाटेल त्या अवघड चालींवर मला पद करता येणार नाही, असे नाही परंतु ऱ्हस्व–दीर्घाच्या ओढाताणीसाठी क्लिष्ट शब्द घालून पदांचा सांगाडा कसा तरी मी तयार करणार नाही.' (पृ. ४५ संगीत रंगभूमीचे सुवर्णयुग)

देवलांच्या 'शारदा'ने अतिशय सोपी पण प्रासादिक पदे नाट्यसंगीतात आणली त्यात माधुर्य होते. जिव्हाळा होता तसेच एक सामाजिक भानही होते. की नाटकांतील नाट्यपदांना तर सुभाषितांचा दर्जा प्राप्त झाला. उदा. शूरा मी बंदिले, मी अधना न शिवे भीती मना, तव जाया नृपकन्या, प्रेमसेवा शरण इ.

किर्लोस्कर, खाडीलकर, देवल यांच्या नंतरच्या गडकरी, सावरकर, वरेरकर, रांगणेकर यांनी नाट्यपदांचा निराळा बाज पुढे आणला त्यात नाट्यपदांची रचना अधिक काव्यमय, सोपी, गायनानुकूल झाली. नाट्यपदांची

ISSN 2321-4953 (Online)
June- 2017

संख्यासुध्दा नाटकातून कमी झाली हा बदल रसिकांनी आनंदाने स्वीकारला. तर काही वेळा संगीत नाटकापेक्षा त्यातील पदांच्या ध्वनिमुद्रिकांनी रसिकांचे लक्ष वेधून घेतले. उगवला चंद्र पुनवेचा (बकुळ पंडित) काटा रुते कुणाला (जितेंद्र अभिषेकी) मर्मबंधातली ठेव ही (प्रभाकर कारेकर) मधुमीलनात या विलोपिले (आशा भोसले इ. नाट्यपदांच्या ध्वनिमुद्रिका अतिशय गाजल्या, लोकप्रिय झाल्या.

**समारोप :**

संगीत ही प्राचीनतम कला आहे. वेदांतील 'सामवेदा'त संगीताबद्दल माहिती असून भारतीय संगीताचे 'हिंदुस्थानी संगीत' व 'कर्नाटकी संगीत' असे दोन प्रकार मानले जातात. विष्णुदास भाव्यांनी मराठी नाटकांची सुरुवात केली तरी संगीत नाटकांचे प्रवर्तक 'शाकुंतल' कार खाडिलकरांना मानतात. मराठी संगीत नाटकांच्या १०० वर्षांचा कालखंड चार टप्प्यात विभागला असून संगीत नाटकातील संगीतात अमुलाग्र बदल या कालखंडात घडले आहेत. रागदारीयुक्त पदरचनांपासून पुढे मराठी नाट्यसंगीत सातत्याने बदलत गेले व हे बदल त्या त्या काळातील रसिकांनाही मानवत गेले हे वैशिष्ट्ये नोंदवून शोधनिबंधाची सांगता करते.

**संदर्भ :**

१. मराठी नाट्यसंगीत – स्वरूप आणि समीक्षा
२. संगीत रंगभूमीचे सुवर्णयुग
३. मराठी रंगभूमी – अप्पाजी विष्णू कुलकर्णी
४. संगीत संशयकल्लोळ – गो.ब. देवल
५. आस्वादक संगीत समीक्षा – श्रीरांग संगोराम
६. भारतीय संगीताचे सामान्यज्ञान – किरण फाटक